सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

● वर्ष : ६
● अंक : २५
● पाने : ८
● पुणे

मूल्य ₹ 3

www.chaprak.com

Kamant masale
एकदा वापरून पहाच!
किंग ऑफ टेस्ट
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

■ सोमवार दि. ०४ ते १० जुलै २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

■ Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** ■ Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 04/07/2016

**महाराष्ट्रात स्वत:चे आयुष्य झोकून देऊन संशोधन करणाऱ्या संशोधकांची फार मोठी परंपरा आहे. इतिहासाचार्य राजवाडे, सेतू माधवराव पगडी, श्रीधर व्यंकटेश केतकर ही या परंपरेतील मोठी नावे. शासनाच्या किंवा कोणत्याही संस्थेच्या मदतीशिवाय या मंडळींनी संशोधनाच्या क्षेत्रात प्रचंड कार्य केले. एक व्यक्ती एका आयुष्यात काय करू शकते हे जाणून घ्यायचे असेल तर या संशोधकांचे जीवन अभ्यासणे आवश्यक आहे. डॉ. रा. चिं. ढेरे हे या परंपरेतील आणखी एक महत्त्वाचे नाव.**
**१ जुलै रोजी त्यांचे निधन झाले. या तपस्वी संशोधकास 'चपराक' परिवाराकडून भावपूर्ण आदरांजली!**



# 'असंच एकटा चालत राहीन; वादळ घेऊन अंगावरती...'

**उमेश सणस,** वाई
७३८५९९८१४७

**संशोधकांची** ही त्यागी परंपरा आता नव्या पिढीत फारशी दिसत नाही. अशावेळी ढेरे यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे झालेले नुकसान केवळ अपरिमित असेच आहे. भारतीय इतिहास, प्राच्यविद्या, लोकसाहित्य, संस्कृती या अनोख्या विषयांवर आयुष्यभर संशोधन करणारे डॉ. रा. चिं. ढेरे यांनी महाराष्ट्राचे संशोधन क्षेत्र समृद्ध केले आहे. ज्या विषयाला लोकप्रियता नाही ते विषय हाती घ्यावयाचे व त्यावर संशोधन करायचे ही तशी सोपी गोष्ट कधीच नसते. अथक प्रयत्न, अविरत कष्ट व जिज्ञासू वृत्ती घेऊन जीवनभर विद्यार्थी राहण्याचे व्रत सांभाळणे फार अवघड असते. तेच काम डॉ. ढेरे यांनी आयुष्यभर केले.

कोणत्याही मानसन्मानाची अपेक्षा न करता काम करणे भल्याभल्यांना जमत नाही. प्रसिद्धीचा मोह न आवरणारे लेखक, अभ्यासक सर्व देशात व भाषात पहायला मिळतात. अशावेळी सार्वजनिक जीवनापासून दूर रहावयाचे व प्रसिद्धीपासून दूर राहून आपल्या कार्यासाठी सर्वस्व पणाला लावायचे हे काम सोपे नाही. डॉ. ढेरे यांनी ते यशस्वीपणे करून दाखविले आहे. संशोधनासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करणारा हा संशोधक सातत्याने सार्वजनिक जीवनापासून दूर राहिला. सार्वजनिक जीवन व प्रसिद्धी माणसाला काम करण्यापासून परावृत्त करते हे कदाचित डॉ. ढेरे यांच्या खूप लवकर लक्षात आले असावे. डॉ. ढेरे यांना मिळालेले पुरस्कार व सन्मान अगदीच तोकडे होते. महत्त्वाच्या राजकीय व्यक्ती व संस्थांशी संबंध ठेवणे व त्यांच्या संपर्कात राहणे यासाठी चतुराई अंगी लागते. राजकीय पक्ष व संघटनांना वेळोवेळी अशी माणसे हाताशी लागतात. प्रत्येक विषयावर भाष्य करणारी वाचाळ माणसे माध्यमांनाही पाहिजे असतात. प्रसिद्धीमाध्यमांशी मैत्री करणे याला आजकाल स्मार्ट राहणे असे म्हणतात. या सर्व गोष्टींपासून डॉ. ढेरे प्रकर्षाने दूर राहिले; म्हणूनच महाराष्ट्रातील लोकसाहित्याला नवा आयाम प्राप्त झाला.

'श्री विठ्ठल एक महासमन्वय' या ग्रंथातील डॉ. ढेरे यांची एक वैचारिक मेजवानी आहे. पंढरीचा पांडुरंग हा मराठी मनाचा मानबिंदू आहे. मराठी लोकजीवन समृद्ध करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठल मूर्तीबद्दल डॉ. ढेरे यांनी केलेले संशोधन अचंबित करणारे आहे. पंढरपूरमधील श्री विठ्ठलाची मूळ मूर्ती आता माढा येथील मंदिरात आहे हे डॉ. ढेरे यांचे प्रतिपादन अनेकांची झोप उडविणारे असेच होते. अफजलखानाने स्वराज्यावर स्वारी केली. सन १६५९ मध्ये अफजलखान छ. शिवाजीराजांना मारण्यासाठी स्वराज्यावर चालून आला. मार्गात अफजनखानाने अनेक हिंदू देवस्थानांना उपद्रव दिला. त्याचवेळी अफजलखान पंढरपूरला येणार हे समजताच तिथली विठ्ठलाची मूर्ती तेथून हलविली गेली. ती विठ्ठलमूर्ती माढा याठिकाणी नेली गेली. मूळ विठ्ठलमूर्ती माढा या ठिकाणी आहे. पंढरपूर येथील विठ्ठलमूर्तीच्या ह्रदयावर गूढ मंत्र आहेत असे उल्लेख काही काही पोथ्यांमध्ये आहेत. आता पंढरपूर येथे जी विठ्ठलमूर्ती आहे त्या मूर्तीच्या ह्रदयावर गूढ मंत्र नाहीत. माढा जि. सोलापूर येथील विठ्ठलमूर्तीवर गूढ मंत्र आहेत. तेव्हा तीच मूळ विठ्ठलाची मूर्ती आहे. अत्यंत अभ्यासपूर्वक व पुराव्याच्या आधारे केलेली डॉ. ढेरे यांची ही मांडणी खळबळ उडविणारी ठरली. अनेक अभ्यासकांना व विद्वानांना काय बोलावे हेही समजेना.

या विषयावर महाराष्ट्रात त्यावेळी वाद सुरू झाले. प्रतिवाद सुरू झाले. अनेकांनी डॉ. ढेरे यांना विरोध केला. त्यांची मते व मांडणी चूक आहे असे अगदी अभिनिवेषाने सांगितले. डॉ. ढेरे यांनी या सर्वांना पुन्हा उत्तरे दिली. या सर्व वादात पुराव्यानिशी व कागदपत्रांच्या आधारे कसा प्रतिवाद करायचा याचा आदर्श वस्तुपाठच ढेरे यांनी महाराष्ट्राला दाखविला. या सर्व निमित्ताने डॉ. ढेरे यांच्या वेगळ्याच व्यक्तिमत्वाचे दर्शन महाराष्ट्राला घडले. खरेतर महाराष्ट्राचा आत्मा असलेल्या श्री विठ्ठलमूर्तीचा विषय वादविषय होता. सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी कोणीही काहीही करावे व बोलावे असा हा विषय होता. मात्र डॉ. ढेरे अत्यंत संयतपणे वागले. या विषयाचा वापर ना त्यांनी वैयक्तिक लोकप्रियता मिळविण्यासाठी केला

**पान नं. ७ वर...**

# बाल रंगभूमी

**रुपेरी** पडद्यावर जेव्हा आपण एखादा कलाकार पाहतो तेव्हा आपल्याला त्या ताऱ्याभोवती असलेलं चंदेरी वलय दिसतं; परंतु त्या वलयांकीत आवरणा पलीकडचं विश्व वेगळच असतं. कित्येक वेळा कथानकातील पात्र आपल्या मनात घर करून जातं. त्याची शैली आकर्षित करून जाते; पण ती भूमिका वटवताना त्यापाठी पात्राने घेतलेली मेहनत, भूमिकेची जडण-घडण सहजासहजी लक्षात येत नाही. यासाठी तशी भेदक नजरच असावी लागते.

अशा अनेक मूल्यांचे, अभिनयाचे बाळकडू देणारी, बालमनावर कलेचं महत्त्व बिंबवणारी अजरामर संस्था म्हणजे सिनेजगताची जननी रंगभूमी अथवा बालरंगभूमी.

ज्याप्रमाणे ओल्या मातीला आकार देणं सोपं असतं त्याचप्रमाणे कुठलीही कला अंगी भिनवायची असेल तर बाल्यावस्थेची निवड केली जाते. बालमन हे कोवळं असतं. या वयात संस्कारांचे बीजरोपण उत्तमरित्या होवू शकते.

काही वर्षांपूर्वी बालरंगभूमीकडे वळणारी पावलं मर्यादित होती. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या बालनाट्यसंस्था कार्यरत होत्या. बालनाट्याकडे मुलांचे शालेय सुट्टीतील करमणुकीचे साधन म्हणून पाहिले जायचे; परंतु त्यावेळी त्या नाटकांना लाभणारा प्रेक्षक वर्ग खूप चौकस होता. याउलट आता वर्षाकाठी अनेक बालनाट्य शिबीरे भरवली जातात. कित्येक अभिनय कार्यशाळा चालवल्या जातात. आता बालरंगभूमीकडे केवळ करमणुकीचे साधन म्हणून न पाहता, आपल्या मुलांच्या भविष्याची तरतूद म्हणून व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिले जाते. याचे कारण कदाचित 'रियालिटी शो'चे अमर्याद फुटलेले पेव असावे. प्रत्येकाला आपल मूल लवकरात लवकर सेलिब्रेटी झालेलं पहायचंय. या अट्टाहासापायी आजकाल कुठल्याही प्रकारची सखोल चौकशी न करता, गुणात्मक दर्जा न बघता कार्यशाळांचे वर्ग आणि



गल्ले भरले जात आहेत. त्यावर कहर म्हणजे या कार्यशाळांच्या आपापसात असलेल्या स्पर्धांची तृष्णा भागवण्यासाठी या लहान मुलांची ओढाताण होत असते. इतकं करूनही हल्लीच्या बालनाट्याला हवा तसा प्रेक्षक वर्ग लाभत नाही. क्वचित एखादा प्रयोग 'हाऊसफुल्ल' होतो. त्यातही पन्नास टक्क्यांहून अधिक प्रेक्षक वर्ग हा त्या नाटकात काम करणाऱ्या बालकलाकाराचे आई-वडील, आजी-आजोबा, नातलग असतात. प्रत्यक्षात बाहेरून तिकिट खरेदी करून येणारा प्रेक्षक त्यामानाने कमीच. असं का होतं याची कारणमीमांसा होणं गरजेचं आहे. नाण्याच्या या बाजूचं गांभीर्याने चर्वण व्हायला हवं.

बरं ही झाली नाण्याची एक बाजू. दुसरी बाजू यापेक्षा सुखावह आहे. आजच्या पिढीतील बालवर्गाकडे कटाक्ष टाकता एक वस्तुस्थिती प्रकर्षाने जाणवते की, आजची ही पिढी लहानपणापासूनच कम्प्युटर, मोबाईल, इंटरनेटच्या जगात वावरत असल्या कारणाने अतिशय चलाख आहे. त्यांची बुद्धिमत्ता, प्रसंगावधानता, दामदुपटीने मेहनत करायची तयारी अवाक् करणारी आहे. गरज आहे ती या हिऱ्यांना पैलू पाडण्याची, या कलागुणांच्या वाहत्या झऱ्याला योग्य वाट मोकळी करून देण्याची.

जमेची बाजू म्हणजे काही नाट्यसंस्था अशाही आहेत ज्या मुलांच्या सर्वांगिण कला विकासासाठी सचोटीने काम करत आहेत. नवनवीन उपक्रम राबवत आहेत. बालकलाकारांना हक्काचं व्यासपीठ मिळवून देत आहेत. मुलांमध्ये आत्मविश्वास जागवत आहेत. दुर्दैवाने अशा ठिकाणी पालकांचा कल कमी दिसून येतो. बाजारीकरणाच्या झगमगाटात मोठमोठ्या वल्गना करून दिशाभूल करणाऱ्या तथाकथित संस्थांच्या उंबरठ्यावर ही गर्दीची लाट धावतेय असे चित्र नजरेस पडते.

आणखी एक महत्त्वाची बाब मला येथे नमूद कराविशी वाटतेय. माझी मुलगी बालनाट्यात काम करत आहे. त्यामुळे पालकांच्या मनोवृत्तीचा एकंदरीत आढावा घेता माझ्या असं निदर्शनास आलं जसं की, काही पालक सतत आपल्या पाल्याची इतरांच्या पाल्याबरोबर तुलना करत राहतात. कळत नकळतपणे ते मुलांच्या मनात हा मत्सर, असुरक्षिततेची भावना उतरवत चालले आहेत.

उदाहरणार्थ, एका मुलाला नाटकात अमकी-तमकी भूमिका मिळाली की, ती भूमिका त्याच नाटकातील दुसऱ्या मुलाला मिळालेल्या भूमिकेशी तुलनात्मक किती लहान अथवा मोठी आहे हे पालकांकडून बघितलं जातं आणि त्यावरून प्रसंगी वाद, नाराजी असं कलुषित वातावरण निर्माण केलं जातं. माझ्या मते कुठलीही भूमिका लहानमोठी नसते. ती कशाप्रकारे सादर केली जातेय ते जास्त महत्वाचं. यावरच त्या भूमिकेचं, पर्यायाने नाटकाचं यश अवलंबून असतं. ही साधी गोष्ट पालकांच्या नजरेआड होतेय. किंबहुना मी म्हणेन आपण आपल्या मुलांना इतर मुलांच्या कामाचं अवलोकन करायला शिकवलं पाहीजे. इथं आपणच भांडत बसतो. त्यामुळे मुलांना चुकीचा संदेश दिला जाऊन सहकार्याने काम करण्याच्या वृत्तीला पुरेपूर तडा जातोय.

सरते शेवटी एवढंच सांगेन, मी माझ्या निरिक्षणावरून ज्या बाबी लक्षात आल्या त्या मांडण्याचा प्रयत्न केला. माझा कुणावर वैयक्तिक आकस अथवा राग, लोभ नाही. असेलच तर बालनाट्य चळवळी बद्दल, बालरंगभूमी बद्दल मनस्वी कळकळ. कारण या सर्वातूनच तावून सुलाखून निघणार आहेत सक्षम अभिनय अंगीकारलेले उद्याचे अष्टपैलू कलाकार.

रंगदेवता व रंगभूमीला त्रिवार वंदन !!

**■ सौ.कस्तुरी देवरूखकर**
९७५७२३०६४७

# आळस हा मानवी प्रगतीचा शत्रू

***दिवसभराच्या*** शारीरिक, मानसिक व बौद्धीक श्रमानंतर माणसाला थकवा येतो. सर्वच प्राणीमात्रांना तो येतो. अशावेळी विश्रांतीची आवश्कता असते. ती मिळाली नाही तर इंद्रिये काम करत नाहीत. त्यांची कार्यक्षमता कमी होते. म्हणून माणसाला विश्रांतीची गरज असते. गरज संपूनही माणूस विश्रांती घेत राहिला तर त्याला 'त्या' अवस्थेची चटक लागते. ही विश्रांतीची ज्यादा चटक माणसाला आळशी बनविते. आळसाची आवड वाढते.

अशावेळी अशा आळसी माणसाला मुद्दाम जागे करावे लागते. कर्तव्याचे भान आणून द्यावे लागते. झटकून टाक वेड्या हा दुबळेपणा मनाचा... असे सांगावे लागते. 'आलस्यंहि मनुष्याणां शरीरस्थो महान रिपु:' आळस हा आपल्या शरीराच्या आश्रयाने राहणारा एक



धोकेबाज अंत: शत्रू आहे. तो माणसाच्या पराक्रमाच्या प्रेरणा पंगू बनवितो... व चालत्या-बोलत्या माणसाचे पाहता-पाहता धडपडणाऱ्या किड्यापेक्षा वळवळणाऱ्या किड्यामध्ये रूपांतर करतो. हा आळस माणसाच्या नित्य व्यवहारातून प्रकट होतोच; पण त्याच्या बौद्धीक व्यापारालाही ग्रहण लागते. त्यामुळे त्याची विचारशक्ती पंगू होते व तो गतानुगतिक बनून प्रवाहपतीताचे प्राक्तन भोगू लागतो. आपल्या कर्मण्यतेचा दोष दुसऱ्यावर ढकलण्याची त्याला सवय लागते व दैवावर भिस्त ठेवून कपाळाला हात लावून बसण्याचे दैन्य त्याच्या कपाळी येते. त्याच्या संवेदनांची सर्व दारे-खिडक्या आपोआप बंद होतात. माणूस समाजात राहत असूनही आत्मकेंद्रित बनतो.

म्हणून निदान युवक व विद्यार्थ्यांनी आळस झटकून यशस्वी भावी वाटचालीसाठी तयार झाले पाहिजे.

**■ अरूण रा. कोटगी-बेनाडीकर**
भ्रमणध्वनी ९९२२८०७२१०

## कविता पाठवा

**साप्ताहिक 'चपराक'साठी आपल्या स्वरचित कविता अवश्य पाठवाव्यात. योग्य त्या कविता अंकातून प्रकाशित केल्या जातील.**

**कविता पाठविण्यासाठी पत्ता :**
'चपराक प्रकाशन',
६१७, साईकृपा अपार्टमेंट,
शाहू गणपतीसमोर,
शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२
**ईमेल :** kavyapushp3@gmail.com
**दूरध्वनी :** ०२०-२४४६०९०९, ७०५७२ ९२०९२
**वेबसाईट :** www.chaprak.com



# 'तालीम' मध्ये महाराष्ट्र केसरी विष्णु जोशीलकर



**तालमीत** केलेली पैलवानकी आणि चित्रपटसृष्टी यांचे काहीसे अजब नाते आहे. दारासिंग सारख्या नामवंत मल्लांनी कुस्तीच्या आखाड्यात विदेशी मल्लांना पाणी पाजत अनेक चित्रपटात काम करून आपली चित्रपटसृष्टीतील कारकीर्दही गाजविली. मराठीतही काही पैलवानांनी मोठ्या पडद्यावर आपले दर्शन घडविले. आता महाराष्ट्र केसरी विष्णु जोशीलकर हाही मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करीत असून 'तालीम' या नवीन चित्रपटामध्ये तो एका वस्तादाच्या भूमिकेत दिसणार आहे. अनेक हिंदी चित्रपटांचे संकलन करणारे नितीन मधुकर रोकडे यांनी दिग्दर्शक म्हणून मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले असून आपल्या 'तालीम'द्वारे पहिल्याच चित्रपटात 'कुस्ती'ला हात घातला असून त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र केसरी विष्णु जोशीलकर यांना रुपेरी पडद्यावर आणण्याची संधी साधली आहे. कुमार हंगळे हे 'तालीम' चित्रपटाची निर्मिती करीत आहेत. आजपर्यंत अनेक कुस्तीचे फड गाजवून महाराष्ट्र केसरी पदासह शिवछत्रपती पुरस्कार मिळविणारे विष्णु जोशीलकर यांनी आपल्याला 'वस्तादा'ची भूमिका मिळाल्याचा आनंद व्यक्त करताना आपण हाही 'डाव' यशस्वी करून दाखवू असा विश्वास व्यक्त केला.

'तालीम'ची कथा नितीन मधुकर रोकडे यांचीच असून अभिजित कुलकर्णी, सिकंदर सय्यद यांच्या सहायाने त्यांनी संवादही लिहिले आहेत. फारूक खान यांनी चित्रपटाचे छायांकन केले असून संतोष दहिफळे यांची साहसदृश्ये आहेत. 'तालीम' मध्ये विष्णु जोशीलकर यांच्यासह मिताली जगताप, वैशाली दाभाडे, अभिजित श्वेतचंद्र, छाया कदम, अनिकेत गायकवाड, विद्या सावळे आदींच्या भूमिका आहेत. ◆

---

# आता प्रतीक्षा 'वायझेड'गिरीची

**'वायझेड'** असं अतरंगी नाव असलेल्या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून मराठी प्रेक्षकांना लागून राहिलेली उत्सुकता नुकत्याच प्रदर्शित झालेल्या त्याच्या पोस्टरने अजूनच वाढवली आहे. त्यात हा चित्रपट समीर विद्वांस आणि क्षितिज पटवर्धन या अतिशय गुणी लेखक- दिग्दर्शक जोडीचा असल्यामुळे सिनेमाबद्दलची उत्सुकता आणखी ताणली गेली आहे. याच पार्श्वभूमीवर चित्रपटाचं पहिलं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं. सगळ्या रंगांचा वापर करून लिहिलेली इंग्रजी वायझेड ही अक्षरं अशा स्वरुपाचं हे पोस्टर पाहिल्यावरच चित्रपटात काहीतरी वेगळं पहायला मिळणार याचा अंदाज येतो. हे आकर्षक पोस्टर सोशल मीडियावर व्हायरल झालं असून आता स्टारकास्ट कोणती असेल यावर सोशल कट्टयावर चर्चा रंगत आहे. एव्हरेस्ट एंटरटेनमेंटच्या संजय छाबिया आणि प्रतिसाद प्रॉडक्शन्सचे अनीश जोग यांची निर्मिती असलेल्या 'वायझेड' चित्रपटाच्या या पहिल्यावहिल्या पोस्टरनं नुकतंच मुंबईच्या सिद्धीविनायक मंदिरात बाप्पाचं दर्शन घेतलं.

समीर विद्वांस आणि क्षितिज पटवर्धन या जोडीनं आतापर्यंत नाट्य आणि सिनेमा क्षेत्राला एकापेक्षा एक सरस व दर्जेदार कलाकृती दिल्या आहेत. 'डबलसीट' आणि 'टाईमप्लीज' हे त्यांचे सिनेमे सुपरहिट ठरलेले आहेत. रोजच्या जगण्याशी संबंधित तरीही टवटवीत कथा, क्षणात आपल्याशा वाटणाऱ्या व्यक्तिरेखा आणि विनोदाचा प्रसन्न शिडकावा हे त्यांच्या आतापर्यंतच्या कलाकृतींचं ठळक वैशिष्ट्य राहिलेलं आहे. त्यामुळे साहजिकच 'वायझेड' सिनेमात कोणते कलाकार दिसणार? त्यांच्या व्यक्तिरेखा कशा असतील? पात्रांना अतरंगी नाव देण्याची त्यांची पद्धत या चित्रपटातही पहायला मिळणार का? असे बरेच प्रश्न चाहत्यांना पडले आहेत. त्याची उत्तरं मिळायला वेळ असला, तरी सेटवरच्या सूत्रांनुसार हा चित्रपट अतिशय मनोरंजक आहे. सगळ्याच वयोगटातल्या चाहत्यांना आवडेल असा हा चित्रपट असून त्यानं 'वायझेड' या शब्दाचा अर्थच बदलेल. हे ऐकल्यावर चित्रपटाची उत्सुकता आणखी वाढणार असली तरी ही 'वायझेड'गिरी सुरू होईपर्यंत थोडं थांबावं लागेल.







# 'सत्यशोधक'चा मुहूर्त




**थोर** समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित 'सत्यशोधक' या मराठी चित्रपटाचा मुहूर्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच संपन्न झाला. यावेळी विधान परिषद सभापती रामराजे नाईक निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, संसदीय कार्यमंत्री गिरीश बापट, आमदार नीलम गोऱ्हे, विधान परिषद सचिव यु. के. चव्हाण, प्रधान सचिव अनंत कळसे या मान्यवरांसह अभिनेता संदीप कुलकर्णी, दिग्दर्शक निलेश रावसाहेब जळमकर व संगीतकार अमितराज उपस्थित होते. वैयक्तिक आयुष्यासोबत सामाजिक जीवनातही अतिशय खडतर आणि आव्हानात्मक परिस्थितीवर यशस्वीपणे मात करणाऱ्या जोतिबांचा जीवनपट प्रत्येकासाठी प्रेरणादायी असेल असे सांगत मुख्यमंत्र्यांनी 'सत्यशोधक' चित्रपटाला शुभेच्छा दिल्या.

समता फिल्म्सची प्रस्तुती असलेल्या सत्यशोधक चित्रपटातून महात्मा जोतिबा फुलेंचा जीवनपट उलगडून दाखवला जाणार आहे. जोतिबा फुलेंनी समाज परिवर्तनाचे महान क्रांतीकार्य केले. सत्यशोधक चरित्रपटाच्या माध्यमातून महात्मा जोतिबा फुलेंच्या या परिवर्तनाच्या कार्याची माहिती आजच्या पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महात्मा जोतिबा फुलेंची भूमिका अभिनेते संदीप कुलकर्णी साकारत आहेत. चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन निलेश रावसाहेब जळमकर यांनी केलं असून चित्रपटाच्या कार्यकारी निर्मात्याची जबाबदारी योगेश जाधव यांनी सांभाळली आहे. प्रवीण तायडे, राहुल वानखेडे, विशाल वाहूर वाघ, अरुण वानखेडे, निखिल पडघन, विनय वानखेडे या सगळ्यांचं चित्रपटाच्या निर्मितीत महत्त्वाचं योगदान आहे.

छायांकनाची जबाबदारी अरुण प्रसाद यांनी तर कलादिग्दर्शनाची जबाबदारी विश्वनाथ मिस्त्री यांनी सांभाळली आहे. संगीत अमितराज यांचं आहे. वेशभूषा महेश शेरला यांची असून रंगभूषा जितेंद्र म्हात्रे व निशिकांत उजवणे यांची आहे. येत्या ३ जून पासून 'सत्यशोधक'च्या चित्रिकरणाला मुंबईत सुरुवात होणार आहे. ◆

**जाणारे जातील येणाऱ्यांनी यावे**
**या चषकामधले मद्य चमकते प्यावे**
**क्षणभंगुर सगळे त्यावर नंतर बोलू**
**ही मैफिल मित्रा सदा पाहिजे चालू...**

# पराधीन आहे जगती...

**रमेश** गोविंद वैद्य यांच्या रुबाया मी कार्यालयात बसून वाचत होतो. माझे सहकारी ऐकत होते. मध्येच सुभाष कुदळे यांनी मला थांबवले. ते म्हणाले, ''जाणारा गेला. माझ्या आयुष्यात फार मोठी पोकळी निर्माण झालीय. ही मैफिल फार काळ चालू राहिल असे मला वाटत नाही...''

हृदयात चर्र झाले! आमचे सर्वांचे लाडके राजाभाऊ परदेशी आम्हाला सोडून गेले होते. त्यांची आणि कुदळे सरांची बालपणापासूनची गट्टी. दोघेही पुणे महानगरपालिकेच्या परिवहन महामंडळात कामाला. वास्तव्यही शेजारी शेजारीच. कुदळे आणि परदेशी म्हणजे 'दो हंसो का जोडा'. कुठेही गेले तरी दोघंही एकत्रच जाणार!

आम्ही घुमानच्या संमेलनाची तयारी करत होतो. त्या दिवशी दुपारी बाराच्या दरम्यान राजाभाऊ एकटेच कार्यालयात आले. मला म्हणाले, ''सुभाषच्या पुस्तकाचे डीटीपी झालेले स्क्रीप्ट द्या. तुम्ही घुमानहून येईपर्यंत मी वाचून घेतो.'' माझ्या सहकाऱ्याने त्यांना प्रिंटस् दिल्या. ते घेऊन ते कुदळेंच्या घरी गेले. दोघेजण थोडावेळ क्रिकेट पाहत होते. साडेतीनच्या दरम्यान कुदळेंच्या घरून ते बाहेर पडले आणि चार वाजता अचानक त्यांना फोन आला की, 'राजाभाऊ गेले...' साश्रू नयनांनी त्यांनी आम्हाला फोन केला. तीन-चार तासापूर्वी भेटून गेलेला माणूस असा अचानक जातो हे सत्य पचवणे अवघड होते. मात्र नियतीपुढे कुणाचे काय चालणार?

त्यानंतर सुभाष कुदळे सर खंगत गेले. त्यांचा एकटेपणा सहजपणे कुणालाही जाणवायचा. 'चपराक'च्या कार्यालयात आल्यानंतर त्यांचे डोळे आपोआप पाणवायचे. आम्हीही अस्वस्थ व्हायचो आणि आज सकाळी फोन आला की, ''अण्णा गेले.'' हा आमच्यासाठी धक्काच आहे. 'चपराक'चे एक महत्त्वाचे लेखक गेल्याने आम्ही शोकसागरात आहोत.

तेव्हा 'चपराक'चे कार्यालय काळ्या हौदाजवळ होते. प्रकाश खानविलकर, राजाभाऊ परदेशी, सुभाष कुदळे ही पीएमटीतील मंडळी 'चपराक'मध्ये सातत्याने लिहायची. एकदा राजाभाऊ आणि कुदळे सर आमच्याकडे आले आणि त्यांनी गंभीरपणे मला सांगितले, ''मी 'समईची वात' आणि 'दंगल' या कादंबऱ्या लिहिल्या. 'प्रितीची ओंजळ' हा काव्यसंग्रह आहे. मात्र कुणी फारसे वाचत नाही. लेखक म्हणून माझी वाढ संपलीय का? तुम्ही संपादक आहात. न्याय करा...''

मी त्यांची पुस्तके ठेऊन घेतली. त्याची धाटणी लक्षात आली होती. त्याच्या पुढच्या भेटीत मी त्यांना सांगितले, ''तुम्ही आता निवृत्त झाला आहात. आजोबांच्या भूमिकेत आहात. आता त्याच नात्याने बालसाहित्य लिहा. तुमची पुस्तके मी छापतो. ती वाचकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवतो.''

'बालसाहित्य लिहिणे जमेल का?' अशी शंका त्यांच्या मनात होती. त्यांना म्हणालो, ''आजोबा म्हणून पुढच्या पिढीला अंतःकरणापासून जे सांगावेसे वाटते ते सांगा. बिनधास्त लिहा. पुस्तकाची आणि विक्रीची चिंता करू नकात. ती माझी जबाबदारी. तुम्ही फक्त लिहा.'' राजाभाऊंनीही माझ्या म्हणण्याला पाठिंबा दिला. ते म्हणाले, ''सुभाष तू मनावर घे. लिही. ही पुस्तके खपली नाहीत तर मी विकतो. नुकसान होणार नाही हा माझा शब्द.''

**संपादकीय**
घनश्याम पाटील : ७०५७२९२०९२



त्यानंतर काही दिवसातच त्यांनी मला त्यांच्या लेखनाचं बाड आणून दिलं. साध्या, सोप्या, रसाळ भाषेतून त्यांनी संस्काराचे बीज पेरले होते. चिमुकल्यांच्या भावविश्वात आनंद पेरताना ते हरखून गेले होते. त्यांचे आम्ही 'नवलकथा' हे बालसाहित्याचे पुस्तक प्रकाशित केले. त्याची आवृत्ती हातोहात गेली. त्यानंतर त्यांचा उत्साह वाढला आणि त्यांनी 'चार शिलेदार' ही किशोर कादंबरी लिहिली. तीही आम्ही 'चपराक'कडून प्रकाशित केली. सर्व वृत्तपत्रांनी त्यांच्या या कसदार लेखनाची दखल घेतली. दूरदर्शनने त्यांची मुलाखत घेतली आणि ती 'सह्याद्री' वरून प्रसारितेही केली. मग मात्र ते खुलले. सातत्याने लिहू लागले. 'या चिमण्यांनो परत फिरा रे' हे पुस्तकही त्यांनी तितक्याच उत्साहात पूर्ण केले. त्यांच्या पुस्तकासाठी ते माझ्या प्रस्तावना आग्रहपूर्वक घ्यायचे. 'यांच्यामुळे मी लिहिता झालो, हे नसते तर लेखक म्हणून मी संपलो असतो' असे प्रत्येक व्यासपीठावरून ते अभिमानाने सांगायचे. मी संकोचायचो. 'असे सांगू नका' असे मी त्यांना बजावल्यावर ते सांगायचे, 'मला समाधान मिळते. सत्य लोकांसमोर आले पाहिजे. तुम्ही वयाने लहान आहात; मात्र मी पुन्हा तुमच्यामुळे उभारी आणि भरारी घेतलीय...' मीही तिथल्या तिथे तो विषय सोडून द्यायचो.







ज्येष्ठ पत्रकार विनायक लिमये यांनी एकदा 'चपराक' कार्यालयात त्यांना सुचवले, ''तुम्ही पीएमटीत होता. आता पीएमटीचा इतिहास लिहा. तुमचे आयुष्यच त्यात गेल्याने त्यात जिवंतपणा येईल.. राजाभाऊ तुम्हाला त्यात मदत करतीलच...'' हे त्यांनी मनावर घेतले. मात्र त्यात थोडा बदल करून त्यांनी पीएमटीचे चालक आणि वाहक यांच्या सुखदुःखावर आधारित कादंबरी लिहायचा घाट घातला. कात्रज ते निगडी हा बसमार्ग डोळ्यासमोर ठेऊन 'बस नंबर बेचाळीस' ही लघुकादंबरी लिहिली. 'सजग नागरिक मंच'चे विवेक वेलणकर यांची प्रस्तावना त्यासाठी त्यांनी प्रयत्नपूर्वक मिळवली.

महाराष्ट्र भूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, डॉ. सदानंद मोरे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. श्रीपाल सबनीस अशा मान्यवरांच्या उपस्थित त्यांच्या पुस्तकांची प्रकाशने 'चपराक'च्या व्यासपीठावर झाली. त्यामुळे ते म्हणायचे, ''माझ्या आयुष्याचे सार्थक झाले.'' त्यांचे 'बस नंबर बेचाळीस' हे पुस्तक शेवटच्या टप्प्यात असतानाच राजाभाऊंनी आम्हा सर्वांचा कायमचा निरोप घेतला. त्यामुळे ते हादरले. 'आता माझे काय होणार?' असे ते सातत्याने म्हणायचे. मित्रवियोगाचे दुःख त्यांना कधीच लपवता आले नाही. त्यांची काळजी वाढली होती. पुढे हे पुस्तक प्रकाशित झाले. एका पिशवीत प्रती घेऊन ते प्रत्येक बस डेपोत फिरायचे. अधिकारी, कर्मचाऱ्यांना दाखवायचे. पहिली आवृत्ती त्यांनी अवघ्या पंधरा दिवसात स्वतःच खपवली. 'हे बघायला राजा असायला हवा होता' असे ते कित्येकदा म्हणायचे. या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे काम आता सुरू आहे. मुखपृष्ठ छापून झालेय. दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने त्यांचे मनोगत थोडेसे बदलून आतील पाने छपाईला द्यायची होती... आणि आज ही बातमी आलीय. 'पराधीन आहे जगती पूत्र मानवाचा' हे असे दुर्दैवीरित्या कायम सिद्ध होते.

''माझा नातू इंग्रजी माध्यमात आहे. त्याला अजिबात मराठी वाचता आणि बोलता येत नव्हते. मात्र 'आजोबांचे पुस्तक' म्हणून तो माझ्याकडून या कथा सतत ऐकायचा. हळूहळू तो वाचायला लागला. आता तो उत्तम मराठी बोलतो आणि मराठी वाचतो देखील. 'चपराक'मुळे बालसाहित्य लिहू लागलो. मात्र त्यातून माझा नातू मराठी वाचतोय हा माझ्यासाठी सर्वोच्च पुरस्कार आहे'' असे ते सातत्याने सर्वांना सांगायचे.

काही दिवसापूर्वीच त्यांचे पीएम पीएममधील सहकारी मोहन ननावरे यांचा दूरध्वनी आला. त्यांनी सांगितले, ''कुदळेंना दवाखान्यात दाखल केलेय. प्रकृती स्थिर आहे. अॅन्जीओप्लास्टीची शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडलीय.''

मागच्या आठवड्यात 'चपराक'चे सलग चार कार्यक्रम झाले. त्या धावपळीत त्यांच्याकडे जायचे जायचे म्हणत तसेच राहून गेले. कालच त्या व्यापातून थोडा निवांत झालो. आमच्या कार्यकारी संपादिका म्हणाल्या, ''उद्या आपण कुदळेंना भेटून येऊ...'' आणि आज सकाळी सकाळीच फोन आला, ''अण्णा गेले....''

काय बोलावे? नियतीच्या मनातले कोणीच ओळखू शकत नाही. आपल्या भावनांच्या भळभळत्या जखमा कायम वाहत राहतात. अनेकवेळा रंगवलेल्या मैफली, विविध विषयांवरील चर्चा, सुखदुःखाचे प्रसंग हे सारे सारे फक्त आठवणीतच राहते.

या दुःखातून सावरायचे बळ त्यांच्या घरच्यांना मिळो आणि सुभाष कुदळे सरांच्या आत्म्याला शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली!! ■

# ‘पैसा’वादाचे सर्वच बळी

**परवाच** कामानिमित्ताने कोल्हापूरला गेलो होतो. कोल्हापूरच्या बसस्थानकावर उतरलो. बसस्थानकाच्या समोरच असणाऱ्या रिक्षा स्टॉपवर गेलो आणि रिक्षामध्ये जाऊन बसलो. अन्‌ त्या रिक्षावाल्याला सांगितलं की, राजारामपूरी तिसऱ्या गल्लीत घेऊन चल... त्यानं राजारामपूरीच्या तिसऱ्या गल्लीत आणून सोडलं. मी त्याला औपचारिकता म्हणून विचारलं. ’’किती पैसे झाले?’’ त्यानं मीटरकडे पाहत उत्तर दिलं. ’’सहाब, मीटर के हिसाब से अठराह हो गये।’’ मी त्याला वीस रूपयाची नोट काढून दिली. राहिलेले दोन रूपये तो माघारी देईल या आशेने त्या ठिकाणी थोडा वेळ थांबलो. त्याच्याकडे सुट्टे पैसे असताना देखील पैसे नसल्याचा आव आणत तो खिसे चाचपण्याचं नाटक करू लागला. त्याच्या त्या हालचालीकडे पाहिल्यानंतर मी त्याला विचारलं ’’क्या हूआ?’’ त्यावेळी त्यानं उत्तर दिलं. ’’सहाब, छुट्टा पैसा नहीं है।’’, ’’अरे मग कोठूनही आणून देना!’’ मी जरा प्रवासामुळे वैतागललेल्या स्वरातच बोललो. त्यावेळी त्यानं त्याच्या पँटच्या मागच्या खिशात असणारं दोन रूपयाचं नाणं काढलं आणि माझ्या हातावर टेकवत तो म्हणाला ’’क्या सहाब, देश के नेता लोग दो-दो हजार कोटी रूपयोंसे कमाते है। हमने तो सिर्फ दो ही रूपये ले लिये, तब तुम इतना घुस्सा करते हो।’’ त्याच्या त्या शेवटच्या वाक्याने माझ्या विचारांची चक्रे अतिवेगाने फिरू लागली आणि मग वाटायला लागलं की, समाजातील प्रत्येक माणूस हा कोणत्या ना कोणत्या वादात अडकलेला आहे. मग तो मार्क्सवाद असेल, आंबेडकरवाद असेल, हिंदुत्ववाद असेल, पुरोगामीवाद असेल, कट्टरतावाद असेल किंवा मानवतावाद असेल; पण समाजातील बहुसंख्य माणसे ’पैसावाद’ (मनीइझम) यामध्येही अडकलेली दिसतात.

मला आजही आठवतंय की, आठवीत असताना आमच्या तुकाराम कुंभार सरांनी विंदा करंदीकरांच्या ’घेता’ कवितेच्या धर्तीवर एक उपहासात्मक काव्यपंक्ती सांगितली होती की,

**देणारे देत आहेत, घेणारे घेत आहेत**
**डोळ्यावरची कातडी काढून पाहणारे पाहत आहेत**
**इकडून तिकडे सगळीकडे पाहणाऱ्यांची गर्दी आहे**
**शाळेमध्ये बसलेला प्रत्येक खाटीक दर्दी आहे**
**चार-पाच शाळा काढून बगळे मासे खात आहेत**
**देणारे देत आहेत...**

या कवितेचा अर्थ लक्षात घेतला तर ’पैसावाद’ म्हणजे काय? हे कळतं. याला आत्ताच्या भाषेत भ्रष्टाचार म्हणतात. आज आमच्या स्वातंत्र्यदेवीच्या वयाची पासष्ठी ओलांडली तरी आम्ही विकासाचा पूर्ण टप्पा गाठू शकलो नाही आणि जो काही विकास झाला तो नेमका कोणाचा झाला? तुमचा, माझा, की सत्तेवरती बसणाऱ्या राज्यत्यांचा झाला? एक विचारवंत असं म्हणतो की, ’मॅन पॉवर’, ’मनी पॉवर’ आणि ’मसल पॉवर’ या तीन पॉवर ज्याच्याकडे असतात. तो या वादामध्ये आघाडीवर असतो.

यामध्ये सामान्य माणूस मागे आहे असंही म्हणता येत नाही. कारण त्याच्या रोजच्या जगण्यातून ते दिसून येतं. उदाहरणार्थ आपला मुलगा दहावीत पास व्हावा म्हणून मारूतीच्या पायावर



एक रूपया ठेऊन त्याला नारळ फोडणारी त्याची आई... आपला धंदा बरकतीत यावा म्हणून बालाजीसारख्या देवांशी पार्टनरशीप करणारे धनवंत व्यापारी... आणि वाहतूकीचे नियम धाब्यावरती बसवून ट्रॅफिक हवालदाराशी तडजोड करणारी स्वार्थी माणसं... यांच्याकडूनसुद्धा हा पैसावाद फोफावतो. या पैसावादामध्ये पैसा इतका मोठा होतो की, माणुसकीला मायेची कदर अन्‌ स्नेहाचा पदर उरतच नाही. भौतिक सुखसुविधांचा अतिरिक्त हव्यास ज्यावेळी माणसांमध्ये निर्माण होतो त्यावेळी चंगळवाद आणि चंगळवादातून पैसावादाची निर्मिती होते. मुंबईतील कांदिवली भागात एकतानगरमध्ये राहणारी अमृता साळवी नावाची बाई (आई) स्वत:चा दीड महिन्याचा मुलगा

■ **अर्जुन नलवडे,** पाटण, सातारा, ७३८५६११३५३

केवळ काही पैशासाठी विकते, काही वर्षांपूर्वी उत्तराखंडमध्ये झालेल्या महाप्रलयामध्ये पंचवीस रूपयाचा नाष्टा अडीचशे रूपयाला तेथील स्थानिक लोकांनी विकला होता, हजारो स्त्री अर्भकांची हत्या डॉक्टरांनी निव्वळ पैसा कमविण्याच्या उद्देशाने केली, बंगळुरूमध्ये एका डेंटिस्टने आपल्या पत्नीने माहेरहून पंचवीस लाख रूपये आणले नाहीत म्हणून तिला स्वमूत्र प्राशन करण्यास भाग पाडले. या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनांचा विचार केला तर या ’पैसावादा’ला चोख उत्तर संत तुकाराम महाराजांचा अभंगच देऊ शकेल. महाराज असं म्हणतात की,

**तुका म्हणे अवघे सोंग। तेथे कैचा पांडुरंग।।**
**धन मेळवुनि कोटी। सवे न ये लंगोटी।।**
**पलंग न्यायला सुपती। शेवटी गोवऱ्या सांगाती।।**

म्हणजेच कोटी-कोटी रूपये कमवाल तुम्ही; पण आयुष्याच्या शेवटी कमरेवरची लंगोटीसुद्धा सोबत नेता येणार नाही. उंची आसनं, मऊ बिछाने, पलंग याच ठिकाणी ठेऊन शेवटी पेटत्या गोवऱ्यांच्या शय्येतच अखेरची विश्रांती घ्यावयाची आहे. मला वाटत हा अभंग प्रत्येकाने आपल्या अंत:करणामध्ये जतन करून ठेवला पाहिजे.

पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी तर ’पैसावादा’ची मुहूर्तमेढच रोवली. त्यामध्ये चारा घोटाळा, बोफर्स घोटाळा, तेलगी घोटाळा, सत्यम घोटाळा, आदर्श घोटाळा यांचा समावेश होतो आणि म्हणूनच की काय ही म्हण पडली असावी. की, ’पाच साल रहूँगा, जमके पैसा कमाऊँगा’ नैतिकतेच्या मार्गाने जाऊन आयुष्यात काहीच मिळत नाही म्हणून अनैतिक मार्गाने जाऊन खूप काही मिळविण्याचा माणूस प्रयत्न करतो. इथंच खऱ्या अर्थाने ’पैसावादा’चा जन्म होतो. एखादी स्त्री आपल्या पोटासाठी, कुटुंबासाठी देहविक्रीचा व्यवसाय करते तेव्हा समाज तिला वेश्या म्हणतो तर आम्ही निवडून दिलेले लोकप्रतिनिधी स्वत:ला संसदेमध्ये विकत होते, तेव्हा मात्र पैसावादाची ताकद किती असू शकते. हे दिसून येतं होतं.

या पैसावादामुळे चंगळवाद निर्माण होतो आणि त्यातून संस्कृती बिघडते. या बिघडणाऱ्या संस्कृतीवर भाष्य करताना प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणायचे, ’’हल्ली शबरीची बोरे, सुदाम्याचे पोहे गोष्टीतच राहताना दिसतात अन्‌ पंचतारांकित प्रसिद्धिचे स्वर सर्वांनाच आवडू लागतात. साधी राहणी व उच्च विचारसरणी ही वाक्यं पुस्तकाचा आश्रय घेताना दिसतात. दिल्लीला फार थंडी पडलीय. इकडं कोण येणार असंल तर दोन गोधड्या पाठवून द्या. असे म्हणणारे क्रांतीसिंह नाना पाटील... घेतलेल्या गाडीचे हप्ते जन्मभर फेडू न शकणारे लाल बहादूर शास्त्री हे आता पुस्तकांच्या चौकटीत अडकलेले दिसतात.’’ असं म्हणतात की, काळ्याकुट्ट अंधारानंतर सूर्य पुन्हा उगवतो; पण मला वाटतं या ’पैसावादा’च्या काळ्याकुट्ट अंधारात तुम्ही-आम्ही चाचपडत आहोत. हा अंधार आम्हाला दूर करायचा असेल तर प्रत्येकाने आपल्या अंत:करणात नैतिकतेची, नीतिमत्तेची आणि निस्वार्थतेची ज्योत पेटवली पाहिजे. कारण जीवनाच्या रणांगणात अर्जुनाचे चैतन्य आणि श्रीकृष्णाचा विवेक यांची युती घडते तेव्हाच गीता अवतरते; पण त्याच गीतेत असंही म्हटलंय की,

**यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानम सृज्याहम ।।**

म्हणजे भारतावरती ज्या-ज्या वेळी संकट येईल त्या-त्या वेळी श्रीकृष्ण अवतार घेईल; पण मला वाटतं आजच्या २१ व्या युगात श्रीकृष्ण वगैरे कोणी अवतार घेणार नाही. कारण तो प्रत्येकाच्या अंत:करणामध्ये सामावलेला आहे. त्याला फक्त भारतामध्ये ’पैसावादा’च्या आलेल्या संकटाची जाणीव करून द्या, तो ते संकट मातीत गाडून टाकल्याशिवाय राहणार नाही. गरज आहे ती आपल्याच धडावर आपलीच मुंडकी ठेऊन त्यामध्ये असणाऱ्या मेंदूचा वापर करा... आणि मग बघा एक दिवस ’पैसावाद’ नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. ■

‘चपराक प्रकाशन’चे रसिकप्रिय कवितासंग्रह!..

■ **नवं तांबडं फुटेल** । माधव गिर
■ **माझी कविता** । सरिता कमळापूरकर
■ **आर्यमा** । चंद्रलेखा बेलसरे
■ **सुंबरान** । प्रभाकर चव्हाण
■ **उभारी** । मेघा टिळेकर
■ **सजवलेले क्षण** । प्रल्हाद दुधाळ
■ **अस्तित्व** । शांताराम डफळ
■ **अनुभूती** । चंद्रलेखा बेलसरे
■ **जिजाऊंची निष्ठा** । मेघा टिळेकर
■ **काव्यलहरी** । शकुंतला देव
■ **रे मना** । मनिषा वाणी
■ **तवंग** । शांताराम हिवराळे
■ **दाटून येताहे काळोखी काहूर** । शांताराम हिवराळे
■ **नाती अशी, जपायची कशी**। सम्राट नाईक
■ **अक्षरगाणी** । संदिपान पवार
■ **अंधारडोह** । शांताराम हिवराळे
■ **नाते मनाशी मनाचे** । रमेश जाधव
■ **तरी आम्ही मतदारराजे** । विश्वास वसेकर

या कवितासंग्रहासाठी संपर्क : ’चपराक प्रकाशन’, पुणे (०२०) २४४६०९०९/७०५७२९२०९२

# देणी



खरंतर आपण जन्माला येतो ते देणेकरी म्हणूनच. ज्या आईवडिलांच्या पोटी आपण जन्म घेतो त्यांचं आपण जन्मभराचं देणं लागतो. हे देणं म्हणजे काय हे ज्याला समजतं तो आईवडिलांची सेवा करतो आणि ही देणी ज्याला समजत नाहीत, तो कृतघ्न ठरतो. जन्मदात्या आईबापांशी वाईट वागतो. अशी अनेक देणी आपण देणं लागत असतो.

ज्या पृथ्वीवर आपण राहतो त्या पृथ्वीचं आपण देणं लागतो; पण आपण ते लक्षातच घेत नाही. जंगलतोड करून आपण आपली पृथ्वी विराण करतो. वाहनांमुळे होणारं प्रदूषण आपण वातावरणात पसरवतो. असंख्य कारखान्यांच्या धुराड्यातून निघणारा धूर आकाशात प्रदूषण वाढवतो. हे सारं आपण 'देण्या'च्या विरूध्द करतो.

ज्या पृथ्वीवर मी जन्मभर राहतोय ती जपण्यासाठी स्वच्छ, सुंदर राहण्यासाठी मी प्रयत्न करायलाच हवेत. तेच आपलं देणं असतं. ज्या समाजात आपण राहतो त्याचं आपण देणं लागतो. ज्या शिक्षकांनी आपल्याला शिकवलं त्यांच्या बद्दलचा कृतज्ञतेचा भाग म्हणून निदान आदर दाखवणं आपल्या हातात असतं. त्या कुणाही शिक्षकाला तुमच्याकडून पैशांची अपेक्षा नसते; पण आपल्या विद्यार्थ्याने मोठे व्हावे, त्याने नाव कमवावे, आपल्याबद्दल आदर बाळगावा एवढीच त्यांची इच्छा असते आणि हेच त्यांचं आपण देणं लागतो. मित्रांनी मित्रांसारखं वागावं, कपटीपणा करू नये. तोंडावर स्तुती आणि मागून चेष्टा करणं हे माणुसकीच लक्षणच नाही. मैत्री खुली असावी तसं शत्रुत्वही खुलं असावं. कुणाला फसवू नये... खरंतर हेच मैत्रीचं देणं आपण लागतो; पण तेही आपण पाळत नाही. अजूनही काही देणी आपण लागतो. ज्या संस्थेत आपण काम करतो त्याच संस्थेचं आपण देणं लागतो किंबहुना ती संस्था तर तुमच्या कष्टाचं मोलही देत असते. अशावेळी जास्त काम करून आपण आपल्या संस्थेचं देणं फेडायला हवं. एखादा व्यापार करून आपण अर्थार्जन करत असू तर त्यात प्रामाणिकपणा दाखवणे आपलं देणं असतं. आपल्या व्यवसायाशी इमान राखणं म्हणजेच 'देणं' देणं!



शब्दतरंग

सदानंद भणगे, नगर

९८९०६२५८८०

आपल्या कुटुंबियांशी तर आपलं फारचं देणं असतं. मुलाबाळांचं संगोपन, त्यांचं शिक्षण, पती-पत्नी ह्यांची कर्तव्ये पार पाडायलाच हवीत, तेच त्यांचं देणं असतं. घरात चांगल्या प्रकारचे संस्कार घडवणं, त्यांना चांगल्या प्रकारचं शिक्षण देणं हे एक प्रकारचं देणंच असतं. ते देणं जर आपण दिलं नाही तर आपण आपल्या कर्तव्याला मुकलो असंच होईल. तुमच्या कुटुंबाचे तुम्ही महत्त्वाचे घटक असता याची जाणीव नेहमीच ठेवायला हवी. मग तुम्ही पती, पत्नी, मुलगा, मुलगी कुणीही असा.

पृथ्वीमातेचं देणं देताना एका ठिकाणी असं वाचलंय की, मृत्युनंतर आपण देह जाळतो. इतकी वर्षे खाऊन-पिऊन पोसला गेलेला देह जळून जातो. नष्ट होतो. सोबत कितीतरी लाकडांची राख होते. देह जर फुटला गेला तर निदान मृतदेहापासून जमिनीला तरी काही पोषक द्रव्ये मिळतील. पृथ्वीमातेचं देणं आपण अशाप्रकारे चुकवू शकतो. मरणोत्तर देहदान करणारे तर याहीपेक्षा भाग्यवान म्हणायचे. त्यांना आपल्या देण्याची पूर्ण जाणीव असते.

ज्या माणसात आपण कायम असतो, त्या माणसांचं मनोरंजन करणं हे एक देणंच होय. मनोरंजन करणं ह्याचा अर्थ त्यांना आनंद देणं एवढाचं नाही तर समोरच्या माणसाला तुमचा कंटाळा यायला नको असं वागणं. आढ्यताखोरतेनं वागणं, स्वत:चं कौतुक करणं, फुशारक्या व बढाया मारणं ह्यापेक्षा समोरच्याशी न बोललेलं परवडतं.

आपल्या शेजारच्या कुटुंबांना आपल्या वागणुकीने त्रास न होणं हे त्यांच्याप्रती एक देणंच असतं. रेडिओ, दूरचित्रवाणी संच मोठमोठ्याने लावणे, रात्री-अपरात्री मोठमोठ्याने गप्पा मारणे, वाहनांचे आवाज करणे ह्या गोष्टी आपण टाळल्या तर आपण त्यांच्या प्रती देणं देवू शकलो असं म्हणता येईल.

सर्व सामान्य माणसापेक्षाही कलावंत समाजाचं देणं जास्त लागतात. आपल्या कलेच्या प्रदर्शनाने लोकांचं मनोरंजन करणं, त्यांच्या आयुष्यात दोन आनंदाचे क्षण आणणं, त्यांच्या दु:खी व कष्टी मनावर आनंदाची फुंकर मारणं कलावंतांना सहज शक्य असतं. एखाद्या संगीतकाराच्या रचनेमुळे चित्तवृत्ती प्रफुल्लित होऊ शकतात, मनावरचा ताण कमी होऊ शकतो. एखाद्या चित्रकाराच्या कलाकृतीमुळे माणसं देहभान हरपू शकतात. एखाद्या लेखकाच्या लेखणीमुळे वाचक काहीकाळ का होईना दु:ख विसरू शकतात. मानवजात सुखी करण्यासाठी कलावंतांनी कला देणं हेच त्यांचं देणं असतं. मी काय देणं लागतो आणि आजपर्यंत काय दिलं? याचा प्रत्येकाने स्वत:च विचार करायला हवा. ■

# थेंबे थेंबे

तीस वर्षांपूर्वीचा प्रसंग मुलगी आजारी पडली. तिची तब्येत जास्तच बिघडली. फॅमिली डॉक्टरांकडे नेले त्यांनी सांगितले की, 'मोठ्या हॉस्पिटलमध्येच ॲडमिट करावं लागेल; पण एक लक्षात घ्या तिथे पोहचेपर्यंत हिला झोपू देऊ नका.' आम्ही तर घाबरूनच गेलो आणि अचानक लक्षात आलं की तिला कॅडबरी, चॉकलेट खूप आवडतात; पण दात खराब होतील म्हणून मीच जास्त खाऊ देत नव्हते. मग मी मुलीला म्हटलं, 'मृदल बेटा आज तू जितकी काऊंट करशील तितकी चॉकलेट मी तुला देईन...' क्षणभर तिचाही चेहरा उजळला आणि ती क्षीण आवाजात मोजू लागली. एक... दोन... दहापर्यंत मोठ्या मुश्किलीनेच मोजले. तिला जागी ठेवत अजून मोज बेटा असं करत हॉस्पिटलमध्ये जाईपर्यंत जाग ठेवलं. तिची एकंदर परिस्थिती पाहून डॉक्टरांनी लगेच आय.सी. यू मध्येच ॲडमिट करून घेतले. उपचारास सुरूवात झाली... पण डिपॉझिट आणि नंतरचा खर्च, औषधं किती लागतील हे सांगितल्यावर डोळेच पांढरे व्हायची वेळ आली.

एरव्ही आपण पैसा श्रेष्ठ नाही म्हणतो... पण आता पैशाचं श्रेष्ठत्व प्रकर्षानं जाणवलं. मिस्टरांच्या आणि माझ्या बँकेतील खात्यातून पैसे काढले तरी गरज पूर्ण होत नव्हती आणि कर्ज घ्यायचं म्हटलं तर कागदपत्रांचे सोपस्कार... जामीनदार... थोडं वेळखाऊ काम आणि गरज तर समोर ठाकलेली... पैशाची गरज पडते आणि सत्वपरिक्षा पाहते. माणसांची जवळून ओळख करून देते. आपल्याला अडचण असली की, त्याचवेळी सगळेच अडचणीत असतात. त्याचवेळी नेमका कोणाकडेच पैसा नसतो. 'असते तर लगेच दिले असते' असंही ऐकायला मिळतं. हे सगळं माहीत असल्यामुळे आपणच काहीतरी मार्ग काढावा असं मनात आलं.

सुवर्णगंध



सुवर्णा जाधव, मुंबई

९८१९६२६६४७

स्त्रीधन! संकटकाळी कामाला येतं आणि जाणवलं... अरे याचसाठी तर आपण दागिने केले होते. अर्थात हे पूर्वीच्या मतप्रणालीला अनुसरून हं! मग मीही दागिन्यांचा आधार घ्यायचं ठरवलं. बँकेत गेले, लॉकरमधून दागिने, चांदीची भांडी काढून आणली. सोनाराकडे गेल्यावर सोनाराने याचे पन्नास हजार होतील असं सांगितलं. दागिने घडवताना जेवढा आनंद झाला नव्हता तेवढा आनंद त्याही परिस्थितीत ती रक्कम ऐकून झाला. कारण डॉक्टरांनी सर्व खर्च पन्नास हजारांच्या आसपास सांगितला होता. ही घटना तीस वर्षांपूर्वीची! तेव्हा पन्नास हजार म्हणजे खूप मोठी रक्कम! वेळ भागली... मुलगी सुखरूप घरी आली.

पण मला चांदी-सोनं उपयोगी पडलं याचं खूप समाधान वाटलं. त्या चांदी-सोन्याच्या दागिन्यामागे इतिहास होता. माझ्या ऑफिसमधल्या माझ्या सगळ्या मैत्रिणी संसारी, गृहकर्तव्यदक्ष, मध्यमवर्गीय सख्या यांची दरमहा पैशाची भिशी असायची; पण एका मैत्रिणीने ठरवलं की आपण सोन्याची भिशी लावूया. पाच मैत्रिणी एक तोळा सोन्याची भिशी. एक तोळा सोनं दरमहा खरेदी करायचं. सोन्याचा जो भाव असेल तेवढी रक्कम पाचही जणींकडून घ्यायची. जिचा नंबर असेल तिला ते द्यायचं. त्यामुळे प्रत्येकीचं वर्षाला दोन तोळे सोनं व्हायचं. पाच वर्षांत दहा तोळे सोनं भिशीमुळे आरामात विनासायास झालं. तशीच चांदीची भिशी दोन वर्ष केली. आपल्याला घर म्हणून आवश्यक वाटतात अशी चांदीची भांडीही त्यात होती. गुलाबदाणी,अत्तरदाणी, करंडा, तबक इ.

ऑफिसमध्ये नवीन प्रशासकीय अधिकारी आले त्यांना सगळ्यांना गोड बोलून सक्तीने पोस्टाची पाच वर्षांची आवर्ती (आर.डी) बचत खाती उघडायला लावली. दरमहा शंभर, दीडशे, दोनशे... त्यामुळे पगारातून परस्पर कपात होऊन बचत होऊ लागली. दर पाच वर्षांनी घसघशीत रक्कम हाती पडू लागली. घरातल्या मोठ्या आर्थिक समस्या सुटू लागल्या किंवा त्यातूनच फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशीनसारखी खरेदी होऊ लागली. पैशांची भिशी हाही एक बचतीचाच प्रकार दरमहा ठराविक रक्कम दहा ते बारा मैत्रिणींच्यामध्ये गोळा करायची. त्यातून दर महिन्याला एक नंबर काढायचा आणि तिला ती रक्कम द्यायची. जिला खूप अडचण असेल तिला सामंजस्याने नंबरही दिला जायचा.

आता या प्रकाराची काही गरज वाटत नाही, हो ना? सकाळी पेपर उघडला, रस्त्याने चालायला लागलं, टीव्ही लावला की जाहिराती पाहायला मिळतात. कर्ज हवयं? मग आमच्याशी संपर्क साधा. हल्ली कर्ज कुठल्याही कारणासाठी मिळतं. घरासाठी, घरदुरूस्तीसाठी, लग्नासाठी, शिक्षणासाठी, फ्रीज, टीव्ही, संगणक वगैरे साठी घेतलेलं कर्ज फेडण्यासाठीही कर्ज मिळते. आतातर क्रेडीट कार्डवर खरेदी! म्हणून माझ्याच कवितेच्या ओळी आठवल्या.

**आधी ऋण काढून सण**
**केले जात नव्हते साजरे**
**त्यामुळे कर्ज नव्हते, नव्हते हप्ते...**
**आधी धजावत नव्हते मन उधारीला**
**क्रेडीट कार्डच्या माध्यमातून गंमत झाली**
**उधारी सर्वसंमत झाली...**

असं म्हटलं जात की, दुसऱ्याला दिलेलं धन व पुस्तकातली विद्या ऐनवेळी कामी येत नाही. त्यामुळे धनसंचय करण्याकडे कल असायचा, बचतीच महत्त्व कळायचं. त्यामुळे 'थेंबे थेंबे तळे साचे' यानुसार पै-पै करून पैसा साठवला जायचा. बचतीच्या पैशाचा आधार वाटायचा. अजूनही वाटतोच.

रस्त्याने जाताना दुर्दैवाने आपण पाणी गळणारे नळ नेहमी पाहतो. घरातही अगदी थेंब-थेंब पाणी नळ नीट बंद न केल्याने पडत राहतं. टपटप करत एकेक थेंब गळतो म्हणून कधी कधी आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. एकदा अशा थेंब थेंब गळणाऱ्या नळाखाली बादली ठेवून पहा. काहीवेळाने बादली भरलेली दिसेल. म्हणूनच तुम्हीही थेंबे-थेंबे तळे साचे... सारखी अगदी थोडी-थोडी का होईना दरमहा बचत करून पहा. त्याच नक्कीच मोठं तळ होईल... करताय ना बचतीला सुरुवात?

हो! पण कामाच्या बाबतीत ही थेंबे-थेंबे होतं बरं का! एक एक काम आपण नंतर करू म्हणून ठेवत गेलो तर कामाचाही ढिगारा साठत जातो. मग निस्तरणं कठीण होत जातं. त्यामुळे कामाचा निपटारा थोडा-थोडा करत वेळीच केला पाहिजे आणि पैसा थोडा-थोडा करत साठवला पाहिजे... मग थेंबे-थेंबे तळे साचे... चा प्रत्यय येतोच! आपणही सहमत आहात ना? ■

# ‘असंच एकटा चालत राहीन; वादळ घेऊन अंगावरती...’

पान १ वरून...

ना सवंग लोकप्रियतेसाठी. डॉ. ढेरे यांच्यावर काहींनी सडकून टीका केली. या टीकेला डॉ. ढेरे यांनी अत्यंत संयमीपणे उत्तर दिले. आधार व पुरावा समोर ठेऊन ढेरे यांनी आपला विषय मांडला. सभ्यपणा व सुसंस्कृतपणाच्या मर्यादा पाळून प्रतिवाद केला. महाराष्ट्राला हा प्रकार नवा होता. वाद व प्रतिवाद सुरू झाले की, महाराष्ट्रातील अनेक दिग्गज वैयक्तिक पातळीवर येत, त्यांचे भान सुटे, खालच्या पातळीवरून मूळ विषय सोडून टीका केली जाई. हा सारा प्रकार महाराष्ट्राने अनेकदा अनुभवला होता. प्रतिस्पर्धी पक्षाची टिंगल करणे, टर उडविणे, त्याचे हसे करणे असले प्रकार सर्रास होत. या सर्व गोष्टीला डॉ. ढेरे अपवाद ठरले. त्यांनी संयमीपणे चोख उत्तर कसे देता येते व प्रतिवाद करताना संयम कसा बाळगला पाहिजे याचा नवा कित्ता महाराष्ट्रासमोर ठेवला. हे ढेरे करू शकले कारण त्यांचा मूळ पिंड अभ्यासकाचा होता. आपल्या अभ्यासातून प्रकट होणारे ते श्रेष्ठ अभ्यासक होते. डॉ. ढेरे यांच्याशी बुद्धीनिष्ठ वाद कोणीही करू शकले नाहीत इतकेच सत्य शेवटी समोर आले.

रामचंद्रपंत अमात्य यांची आज्ञापत्रे हा मराठ्यांच्या इतिहासातील एक महत्त्वाचा दस्ताऐवज आहे. छ. शिवाजीराजांच्या राजकिय व सर्व विषयक धोरणांची माहिती आज्ञापत्रातून होते. ढेरे यांनी आज्ञापत्रांचे संपादन केले आहे. आज्ञापत्रांचे संपादन तसे अनेक अभ्यासकांनी केले आहे; पण आज्ञापत्रांचे साहित्यिक मूल्य काय आहे हे जर समजून घ्यायचे असेल तर ढेरे यांना प्रमाण मानावे लागते. भाषेच्या दृष्टीने आज्ञापत्रांचे महत्त्व अत्यंत सोप्या शैलीत ढेरे यांनी उलगडून दाखविले आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा ढेरे यांचा अभ्यास व व्यासंग याची खात्री पटविण्यासाठी आज्ञापत्रांचे संपादन विशेष महत्त्वाचे आहे. ढेरे यांनी केलेल्या संपादनावरून व त्यांच्या आज्ञापत्रांबद्दलच्या मतांवरून इतिहासाच्या अभ्यासकांतही वाद झाले. मात्र ढेरे यांचे प्रामाणिक प्रयत्न व त्यांनी आज्ञापत्रांचे विशद केलेले महत्त्व याची मोहिनी आजही सामान्य मराठी माणसांवर आहे.

’लोकसंस्कृतीची क्षितिजे’ हे डॉ. ढेरे यांचे आणखी एक पुस्तक. यातील ’शाहिरीची पूर्वपीठिका’ हा लेख वाचताना आजही विस्मय वाटतो. शाहिरी हा शब्द मुसलमानी आहे व त्याची परंपरा ही तिकडून आली असावी असा अनेकांचा समज आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठी ढेरे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. संतसाहित्यात शाहिरीची बिजे आहेत हे पुराव्यानिशी ढेरे यांनी दाखवून दिले आहे. समर्थ रामदासांनी या कविता भाट कवी म्हणून संबोधिले आहे. असे लावण्या, पोवाडे, शाहिरी ही संज्ञा कशी रुढ झाली याची माहिती या लेखात ढेरे यांनी दिली आहे. डफगाणी, कलगीतुरा यांचा संबंध सांगत शाहिरी परंपरा ही अत्यंत पुरातन मराठी परंपरा आहे, तिची नाळ मराठी परंपरेशीच जोडलेली आहे, हे ढेरे यांनी सप्रमाण दाखविले आहे.

खंडोबा हा विषय असो की शाहिरी परंपरा, ढेरे अत्यंत अभ्यासपूर्ण लिहित राहतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा कोणताही संशोधनपर लेख पाहिला तर एक गोष्ट जाणवते की ढेरे हे किमान ८०० ते १००० वर्षातील असंख्य संदर्भ त्या लेखासाठी वापरत असतात. संतसाहित्य, महानुभवांचे साहित्य, पोथ्या, पुराणे, संस्कृत साहित्य यांचा ढेरे यांनी किती बारकाईने अभ्यास केला होता ही गोष्ट ढेरे यांचा लेख वाचताना प्रकर्षाने जाणवते. ढेरे यांनी वापरलेले संदर्भ कोठून तरी ओढून-ताणून आणलेले आहेत असेही नाही. विषयाला आवश्यक व गरज असेल तेथेच ढेरे यांनी संदर्भ दिलेले आहेत. सामाजिक, राजकिय, पौराणिक, ऐतिहासिक संदर्भ वापरताना किती व्यापक अभ्यास लेखकांनी केला आहे याची जाणीव मराठीत ढेरे यांना वाचताना व अनुभवताना होत असते.

ढेरे यांच्या संपूर्ण लिखाणाबद्दल आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. ढेरे यांनी केलेले सर्व लिखाण हे त्या काळात लोकप्रिय झाले. खूप मोठा वाचकवर्ग त्यांना लाभला. अभ्यासकांनी कधीही सामान्य माणसांशी आपले नाते ठेवलेले दिसत नाही. अत्यंत अवघड व बोजड भाषेत लिहिण्याची अनेक अभ्यासकांना सवय होती; मात्र सामान्यांसाठी सोप्या भाषेत लिहिणारा संशोधक ही अशी ढेरे यांची ओळख आहे. संशोधनपर लेखनाला प्रसिद्धी दिली जात नाही, संशोधनपर लेखन सतत अप्रसिद्ध राहते, जास्तीत जास्त असे साहित्य लोकांपर्यंत पोहोचविले जात नाही; कारण त्याला फारसा वाचक वर्ग नसतो. या साऱ्या परंपरा आपल्या कृतीने आणि लेखनाने ढेरे यांनी बदलून टाकल्या आहेत. हेच त्यांचे सर्वात मोठे वेगळेपण आहे.

ढेरे इतिहास, प्राच्यविद्या यांच्यातही रमले; पण त्यांची खरी आवड होती ती लोकसाहित्य याविषयीची. लोकसाहित्यावर लिहिताना शाहिरी व भाट असे सर्व प्रकार त्यांनी अभ्यासले व त्यावर लिहिले. ढेरे यांच्या लेखणीला कोणताही विषय वर्ज्य नव्हता. ’शिवी आणि समाज इतिहास’ हा ढेरे यांचा लेख याचे बोलके उदाहरण आहे. या विषयावर यापूर्वी कोणी लिहिले असे दिसत नाही व नंतरही कोणी लिहिलेले नाही. ७००-८०० वर्षे मराठी समाजात शिवी कशी दिली जात होती, याचा उदाहरणांसह ढेरे यांनी केलेला उहापोह अत्यंत मनोज्ञ असाच आहे. संतापासून ते पंतापर्यंत व लोकसाहित्यापासून ते आजपर्यंत शिवी कशी दिली गेली याची अभ्यासपूर्ण मांडणी करणे तसे फार कठीण आहे. ढेरे लिहितात ते असंख्य संदर्भ देऊन. कोणतेही विधान संदर्भाशिवाय करायचे नाही हा ढेरे यांचा विशेष खाक्या आहे. त्याला अनुसरून ते शिवी या विषयावर जेव्हा लिहितात तेव्हा अगतिक नवी माहिती समोर येते. गाढवावरून शिवी देणे किती जुने आहे याची ढेरे यांनी दिलेली उदाहरणे वाचताना आजही अचंबा वाटतो. या सर्वांसाठी सतत वाचन हवे. प्रत्येक विषयाची आवड व लोकजीवनावर समरसून प्रेम केले तरच शिवी या विषयावर लिहिता येते. डॉ. ढेरे यांनी महाराष्ट्राच्या लोक परंपरांवर विलक्षण प्रेम केले. लोकसाहित्याचा अभ्यास केला व आपली मते लोकांसमोर मांडली. अभ्यासपूर्ण लेखनाला वाचकवर्ग मिळाला. लोकसाहित्याबद्दल जनमानसात कुतूहल निर्माण झाले व त्याने आवड निर्माण झाली.

‘लोकसाहित्य शोध आणि समीक्षा’ या पुस्तकात आपल्या लेखनामागची भूमिका डॉ. ढेरे यांनी सविस्तर सांगितली आहे. लोकसाहित्याला मराठीत प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे एकमेव जीवनध्येय मानून ढेरे लिहित असत, हे त्यांच्या ’शोधांच्या वाटेवर’ हे मनोगत वाचताना जाणवते. इतिहासाचार्य राजवाडे हे ढेरे यांचे आदर्श होते. राजवाड्यांचा ध्यास, ध्येयाप्रती निष्ठा, चिकाटी, व्यासंगी व प्रचंड परिश्रम करण्याची वृत्ती या सर्व गोष्टी ढेरे यांच्या जीवनात जाणवतात त्या याच कारणांमुळे. ’असंच एकटा चालत राहीन वादळ घेऊन अंगावरती’ असे म्हणत आपल्या आवडत्या विषयासाठी आयुष्य पणाला लावणारे डॉ. ढेरे राजवाडे परंपरेतले कदाचित शेवटचे असावेत.

डॉ. ढेरे यांची ग्रंथसंपदा व त्यांचे ग्रंथप्रेम हे सर्वात महत्त्वाचे आहे. ढेरे यांनी अनेक प्राचीन पोथ्या, हस्तलिखिते व पुस्तके यांचा प्रचंड मोठा संग्रह केला. त्यासाठी त्यांनी प्रचंड खर्च केला. प्रायोजक बघून कार्यक्रम करण्याच्या जमान्यात डॉ. ढेरे हे अव्यवहारी व्यक्ती होते हे तर खरेच आहे. गोळा केलेली ग्रंथसंपदा ही मराठी माणसांचा व अभ्यासकांचा ठेवा आहे. म्हणून त्यांना परत सुपूर्द करण्यासाठी ढेरे यांनी केलेले काम त्यांच्या आजवरच्या भूमिकेशी सुसंगत असेच आहे. ’वाचाल तर वाचाल’ हा संदेश नवीन पिढीला समजावून सांगण्यासाठी डॉ. ढेरे यांनी त्यांची स्वबळावर गोळा केलेली ग्रंथसंपदा दाखविणे आवश्यक आहे. प्रसिद्धपासून दूर राहून, जीवननिष्ठा मानून, हयातभर व्रत म्हणून संशोधनात रममाण झालेले डॉ. ढेरे यांना लोकसाहित्याच्या विद्यापीठाचे कुलगुरू मानावे लागेल. महाराष्ट्राचे लोकजीवन व लोकसाहित्य समृद्ध करून हा अभ्यासक आपल्यासाठी नवा आदश निर्माण करून गेला आहे.

## अल्पपरिचय



### डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे

रामचंद्र चिंतामण ढेरे (२१ जुलै १९३० - १ जुलै २०१६) हे मराठी इतिहास-संशोधक व लेखक आहेत. दैवतशास्त्र, सांस्कृतिक इतिहास या विषयांत त्यांचा विशेष अभ्यास असून त्यांनी या विषयांवर विपुल लेखन केले आहे. त्यांना डॉ. अरुणा ढेरे आणि वर्षा गजेंद्रगडकर अशा दोन कन्या आहेत.

रा. चिं. ढेरे यांनी त्यांच्याकडील साहित्याच्या प्रेमापोटी जमा केलेला पुस्तकांचा संग्रह एखाद्या संशोधन संस्थेप्रमाणे ट्रस्टच्या माध्यमातून समाजासाठी खुला करण्याचे ठरविले आहे. त्यांच्या संग्रहामध्ये इतिहास, संत साहित्य, जुने मराठी वाङमय, लोकसाहित्य, लोकसंस्कृती अशा वेगवेगळ्या विषयांवरील साहित्य आहे. मराठी संस्कृतीचा अभ्यास व संशोधन करणाऱ्या तरुण संशोधकांसाठी ही पुस्तके महत्त्वाची ठरणार आहेत.


आपणही ‘चपराक’चे सभासद अवश्य व्हा!

वार्षिक वर्गणी ▶ साप्ताहिक : २०० रु. मासिक : ५०० रु.

संपर्क : तुषार उथळे-पाटील ९५५२८५८१००


‘चपराक’ हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस, सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे-४११ ०४१ येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ Email : info@chaprak.com

# मनातला मोहोर

मातीत पडलेली इतकी सारी फुलं पाहून हळहळ वाटली. ती बिचारी मुकी फुलं आनंदात उमलली होती. राहिली असती एखादा मोसम झाडावर! (अस्तित्वात नसलेल्या) ईश्वरासाठी हजारो फुलं दिवसभरसुद्धा झाडावर राहू दिली जात नाहीत. फुलली रे फुलली की, लगेच ती तोडली जातात! उरलेली बापडी कोमेजतात. संध्याकाळ त्यांचं मरण घेऊन येते.



गुलाबाच्या रंगाचे प्रकार आहेत. आपल्या मनातले विकार त्यांना जोडून माणसाने त्यांचंही वाटप करून टाकलं आहे! लव्हली लाल गुलाबाचा अर्थ प्रेमप्रकरण असा घेतला जातो. त्यामागे देहमोहाचं आकर्षणच अधिक असतं. मानसिक एकनिष्ठा असतेच असं काही नाही!

हिवाळ्यात इतका गारठा असतानाही काही रानटी फुलं जिवंत असतात. त्यांच मला शोभेच्या या पुष्पांपेक्षा जास्त कौतुक वाटतं. 'सुमन' कुठेही रानीवनी उमलतात. सुखाचा वनवास सोसतात. झाडापानाला धरून राहतात. रसाळ फळ देतात. मोहोर नसेल तर आंबा कसा जीव धरेल! मनातही मोहोर येतोच. एखादं लहानगं बक्षीस दूर कुठे मंगळवेढ्यात मला जाहीर होतं, तेव्हा त्या स्पर्धेतल्या यशामुळेही प्रौढ मन मोहोरतंच. परिपक्वतेला आनंदाची पालवी पुन्हा येते! मोहाच्या फुलांचीच नव्हे, तर सरसकट सर्व प्रकारची 'दारू' मी सदैव टाळली, भानावर राहिलो म्हणून सलग तीन दशकं लेखन करू शकलो. मी लोकांच्या व्यथा आणि नशा समजू शकतो; पण त्यातून त्यांनीही बाहेर पडावं निदान ती सवय 'प्रायव्हेट लिमिटेड' ठेवावी.



माधव गवाणकर
९१४५९२४०५३

मनाचा मोहोर दरवळण्याचं आणखी एक कारण म्हणजे अत्यंत हुशार किंवा प्रतिभावंत माणसांचा सुगंधी सहवास! 'आदर्श' हा शब्द फसवा आहे; पण प्रेरक व्यक्ती असतातच. त्या प्रेरणा, ऊर्जा देतात. 'मीडिया'च्या जगातही असे मेहनती कलाकार व विचारवंत पत्रकार आहेत. वृत्तपत्रीय समीक्षेच्या बाबतीत श्री. शंकर सारडांसारखं सातत्य टिकवलं पाहिजे हे मला अगदी तरूण वयापासून वाटत आलं. 'फीचर्स'मधला ग्रेट माणूस म्हणजे निरंजन घाटे! ग्रंथालय हे तर देवालयचं! वाचनसंस्कृती न जपता 'मला लेखक व्हायचंय' म्हणून हात वर करणं हास्यास्पद आहे. मी एकाच जत्रेला टुणकन उडी मारून, प्रसंगी सहकारी पत्रकारांकडून पैसे उसने घेऊन धावतो आणि ती म्हणजे पुस्तकजत्रा अर्थात ग्रंथप्रदर्शन!

मन एकदा मोहोरलं की, भगभगीत उन्हाचं चांदण होतं! फुलपाखरं स्वप्नातही येतात. ती क्षणभंगूर आहेत हे मी विसरून जातो व त्यांच्या पंखांवरच्या 'ओल्या पेंटिंग्ज'चं कौतुक करतो. मिशी आली तरी फुलपाखरं आम्हाला लहानच आहेत. तरूण पिढीशी रोजचं हस्तांदोलन असल्यामुळे मी जास्त तरतरीत, टवटवीत रोहिलो का? तसंच असावं! 'कॅम्पस'वर या सगळ्या पाखरालेकरांचं रोजचं 'गुड मॉर्निंग सर' झेलत झेलत मी कॉलेजचा दादर चढतो! 'काय स्वत:ला समजतो देव जाणे' असंही एखादी विद्यार्थीनी मनात नंतर आणत असेल; पण ओठांवर 'गुड मॉर्निंग' असतंच! म्हणूनच 'मे' महिन्यात उदास वाटतं! बंद असलेलं कॉलेज कधी सुरू होतंय, पाऊस कधी सुरू होतोय असं ज्याला वाटतं, तो खरा मास्तर! त्याच्या मनात एक मयूर जिवंत असतो. 'पसारा' वेगळा 'पिसारा' वेगळा. कोकणात कोकीळ तर अगदी जून महिना आला तरी सखीला साद घालत असतो. प्रणयाचा प्रतिसाद त्याला मिळतोच. ज्याच्या मनाला मोहोर येत नाही, तो यंत्रमानव असतो! मी यंत्रतंत्रांचा गुलाम नाही, मी महामानवही नाही, मला आमराईतला स्वप्नाळू माणूसच राहूद्या! ■

# संत तुकाराम महाराज पालखीचे लोणीत उत्साहात स्वागत



**लोणी काळभोर (सचिन सुंबे):**
लोणी काळभोर येथे संत तुकाराम महाराज पालखीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. पुण्यातील दोन दिवसांचा मुक्काम संपवून पहाटे पालखी मार्गस्थ झाली. आमदार योगेश टिळेकर यांनी भैरोबा नाला येथे पालखीचे स्वागत केले. रस्त्यात ठिकठिकाणी उपवासानिमित्त वारकऱ्यांना खिचडी, चहा, दूध, पाण्याच्या बाटल्या व इतर पदार्थ वाटण्यात आले.

दुपारच्या विश्रांतीनंतर पालखी लोणीकडे निघाली. वाटेत अनेक मंडळींनी पालखीचे स्वागत केले. लोणी येथे पालखी पोहचताच फटाक्यांची आतिषबाजी केली व फुलांची उधळण करण्यात आली. सरपंच सौ. वंदना काळभोर, उपसरपंच योगेश काळभोर व हवेली खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष प्रशांत काळभोर, जि. प. सदस्य विकासअण्णा काळभोर यांनी पालखीचे स्वागत केले. तहसीलदार दशरथ काळे यांनी पालखीची आरती केली.

दुसऱ्या दिवशी पालखी सकाळी साडे सहा वाजता यवत मुक्कामासाठी मार्गस्थ झाली. राजेंद्र पेट्रोल पंपावर कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांसाठी जेवणाची सोय केली. त्याचे नियोजन बापू सुंबे, पिंटू बोरकर, प्रकाश काळभोर, शहाजी काळभोर, अविनाश सुंबे, नीलेश सुंबे, अंकुश गायकवाड, विजय काळभोर, सुभाष काळभोर, तुषार सायकर यांनी केले. बोरकर वस्तीशेजारी पुणे जिल्हा अनुसूचित जाती-जमातीचे (सेज) भाजप उपाध्यक्ष राजेंद्र राखपसरे यांनी पालखीचे स्वागत केले. थेऊर ग्रामपंचायतीच्या वतीने छायाताई काकडे, सरपंच थेऊर, उपसरपंच भाऊसाहेब काळे यांनी थेऊर फाटा येथे स्वागत केले. उरळी कांचन येथे दुपारचा विसावा घेतल्यानंतर दौंड तालुक्यात प्रवेश केला. आमदार राहुल कुल यांनी पालखीचे स्वागत केले. यवत येथे पालखी मुक्कामासाठी सायंकाळी भैरवनाथ मंदिरात थांबली. तेथे भाविकांनी दर्शन घेतले.


## आयुर्वेद शास्त्राची ओळख करून देणारी पुस्तके

आयुर्वेद हे मनुष्यजातीच्या इतिहासातील सर्वात प्राचीन वैदकशास्त्र आहे. आयुर्वेद म्हणजे केवळ आजारांचे व त्यावरील वनस्पती उपचार, जडी, बुटी नाही तर निरामय जीवन जगण्याचा मार्ग सांगणारे भारतीय शास्त्र आहे. सध्या जग भारताकडे आशेने पाहत आहे. योग-आयुर्वेद-अध्यात्मशास्त्र यासारख्या जीवन पद्धतीनुसार संपूर्ण मनुष्यजातीचे जीवन आणखी समृद्ध, निरामय व स्वास्थ्यपूर्ण होईल. ही पुस्तके भारतीय जनमानसाला या आयुर्वेद शास्त्राची ओळख करून देण्याचा प्रयत्न करतात.







संस्कृती

**संस्कृती प्रकाशन**, ६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०
**फोन :** ०२०-२४४९७३४३, ९८२३०६८२९२
**Email :** sanskrutiprakashan@yahoo.com
**www.sanskrutiprakashan.com**